# विज्ञान केंद्र स्थानक 'जुळणी' पूर्ण

## महालक्ष्मी ते विज्ञान स्थानकाचा १०४ मीटरचा पट्टा

म. टा. खास प्रतिनिधी

मुंबई : मेट्रो-३ भूमिगत मार्गातील 'नेहरू विज्ञान केंद्र' स्थानकाची भूमिगत जुळवणी जवळपास पूर्ण झाली. महालक्ष्मी स्थानक ते विज्ञान केंद्र स्थानक, असा हा १०४ मीटरचा पट्टा होता. याप्रमाणे मार्गिकेवरील जवळपास सर्व जुळवण्या झपाट्याने पूर्णत्वाकडे जात आहेत.

मुंबईला पश्चिमेकडून उत्तर-दक्षिण जोडण्यासाठी मेट्रो -३ हा भूमिगत मार्ग प्रकल्प उभा होत आहे. कुलाबा-वांद्रे-सीप्झ, असे त्या प्रकल्पाचे नाव आहे. त्यातील पहिला टप्पा सीप्झ ते बीकेसी उत्तर तर दुसरा टप्पा बीकेसी दक्षिण ते कफ परेड असा होणार आहे. पहिल्या टप्प्याची मार्गिका पूर्ण तयार असून स्थानकांची कामे ८० टक्के झाली आहेत. तर दुसऱ्या टप्प्यातील अंतर्गत मार्गांची जुळवणी अंतिम टप्प्यात आहे.

सूत्रांनुसार, दोन स्थानकांमधील अंतर जुळवण्यासाठी ऑस्ट्रियन तंत्रज्ञानाद्वारे बोगदे खणण्यात आले आहेत. ठराविक अंतरावर हे बोगदे खणले गेले आहेत. त्याद्वारे एक दुसऱ्या स्थानकाशी जोडले जात आहेत. अलिकडेच महालक्ष्मी स्थानकापासून ते वरळीच्या नेहरू विज्ञान केंद्र स्थानकापर्यंत १०४.४६ मीटरपर्यंत अशी जुळवणी पूर्ण झाली.



**मेट्रो-३**

**पहिली भूमिगत मेट्रो**

**एकूण २७ स्थानके**

**पहिला टप्पा- डिसेंबर २०२३**

**दुसरा टप्पा- डिसेंबर २०२४**

याद्वारे नेहरू विज्ञान केंद्राचे बांधकाम ८४ टक्के व तर प्रणालीची कामे ४४ टक्के पूर्ण झाली आहेत.

राज्यातील मेट्रो-३ ही पहिली भूमिगत मेट्रो रेल्वे आहे. आरे जवळील कारशेडमधील सारिपूतनगरपासून ते कफ परेडपर्यंत ही मेट्रो धावणार आहे. त्यामध्ये एकूण २७ स्थानके आहेत. पहिला टप्पा डिसेंबर २०२३ तर दुसरा टप्पा डिसेंबर २०२४ मध्ये सुरू होणार आहे. एकीकडे सीएसटी (आझाद मैदान), महालक्ष्मी, विज्ञान केंद्रासारख्या स्थानकांची कामे अंतिम टप्प्यात असताना दक्षिणेकडील अखेरचे कफ परेड स्थानकही जवळपास ८० टक्के तयार झाले आहे. यातील बांधकाम जवळपास पूर्ण झाले आहे.